# जागतिक साहित्यातील
# सोनेरी शब्दशिल्पे

डॉ. सहदेव चौगुले – शिंदे

**परी प्रकाशन, कोल्हापूर**

KD4

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**जागतिक साहित्यातील सोनेरी शब्दशिल्पे : डॉ. सहदेव चौगुले-शिंदे**

© **सौ. विजया सहदेव शिंदे**
'सालस', ११८२/१८३, प्लॉट नं. १५,
८ वी गल्ली, राजारामपुरी पूर्व, कोल्हापूर.
फोन : (०२३१) २५२८४५६. मोबा. : ९८२३४३१२८२.

**प्रकाशक :**
परी प्रकाशन
निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली,
कोल्हापूर - ४१६ ००१
pariprakashan@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
१५ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये २००/-

आमची ज्येष्ठ कन्या

**अस्मिता ऊर्फ बाबीस...**

सदा तुझे भाव
सरळ सरळ
सत्याशी गट्टी
करतात
कधी तुझा राग
आल्याआल्या जातो
परि तुझी माया
गर्द छाया
कधी तुझ्या मनी
दाट धुकं असे
तरी वाट दिसे
तव मना
कधी तुझा घरी
असेल अभाव
तर घरच बसते
रुसूनच
रिकामे घर
सांगे मग आम्हा
बाबीविना नाही
करमत.

## लेखकाचा परिचय

**प्राचार्य डॉ. सहदेव आबासाहेब चौगुले-शिंदे (भेडसगावकर)**
एम.ए., पी.एच.डी. (इंग्लिश), एलएल. बी. स्पेशल
माजी प्राचार्य, नाइट कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स, कोल्हापूर
पदव्युत्तर अधिव्याख्याता
संशोधन मार्गदर्शक

**प्रकाशित साहित्य –**

+ लोन्लिनेस इन मॉडर्न अमेरिकन पोएट्री
+ लोन्लिनेस इन इंग्लिश पोएट्री
+ प्रतिभेच्या पंखावर : जेफ्री चॉसर ते टेड ह्यूज
+ पाथेय भाग – १, २, ३ (चरित्र संग्रह)
+ छंद अक्षरांचा (ललित गद्य)
+ शब्द आणि संकल्पना (वैचारिक लेख)
+ साहित्यिक यशवंतराव

**आगामी –**

+ चाहूल (काव्यसंग्रह)
+ कथासंग्रह
+ मराठी काव्यातील एकाकीपणाची भावना

## मनोगत...

जागतिक साहित्य ही एक संदिग्ध संकल्पना आहे. विविध देशांतील उत्तमातील उत्तम साहित्य हे जागतिक साहित्याच्या कप्प्यात टाकले जाते. एखाद्या राष्ट्रातील सर्वश्रेष्ठ लेखक सर्वत्र वाचला जातो आणि सर्वत्र त्याला साद आणि दाद दिली जाते. असे साहित्य राष्ट्रीय सीमा, सर्व प्रकारचे भेद, तट व गट यांच्या पलीकडे जाऊन वाचले जाते. तसेच काळाच्या कसोटीवर उतरल्याशिवाय त्याला 'जागतिक साहित्य' ही संज्ञा प्राप्त होत नाही. एखाद्या लेखकाला जागतिक साहित्यिकाचा दर्जा मिळतो तो त्याच्या साहित्यिक गुणांवर व सर्वकाली सर्वत्र त्याच्या पडलेल्या प्रभावावर.

जागतिक साहित्याची संकल्पना स्पष्ट करताना 'Theory of Literature' या ग्रंथात रेने वेलेक आणि ऑस्टिन वॉरन म्हणतात :

"The term 'world literature', a translation of Goethe's *Weltliterature* is perhaps needlessly grandiose, imphying that literature should be studied on all five continents, from New Zealand to Iceland. Goethe, actually, had no such thing in mind. 'World literature' was used by him to indicate a time when all literatures would become one. It is the ideal of the unification of all literatures into one great synthesis, where each nation would play its part in a universal concert. But Goethe himself saw that this is a very distant ideal, that no single nation is willing to give up its individuality... 'World literature' may mean the great treasure-house of the classics, such as Homer, Dante, Cervantes, Shakespeare and Goethe, whose reputation has spread all over the world and has lasted a considerable time. It thus has become a synonym for 'masterpieces' for a selection from literature which has its critical and pedagogic justification but can hardly satisfy the scholar who cannot confine himself to the great peaks if he is to understand the whole mountain ranges or, to drop change." (p. 48)

त्या त्या भाषेतील व त्या त्या राष्ट्रातील अभिजात अथवा अक्षर साहित्याचा जागतिक साहित्यात समावेश होतो. याच न्यायाने भारतीय महान ग्रंथ 'रामायण', 'महाभारत' व कालिदासाचे ग्रंथ यांना जागतिक साहित्यात स्थान प्राप्त होते. कारण असे ग्रंथ सर्वत्र सातत्याने वाचले जातात, त्यांची समीक्षा केली जाते. या वाचन-समीक्षा प्रक्रियेतूनच एखाद्या ग्रंथाला अथवा एखाद्या लेखकाला जागतिक दर्जा प्राप्त होतो. जागतिक साहित्यातील 'सोनेरी शब्दशिल्पे' या ग्रंथातील लेखक हे जागतिक

साहित्यात समावेश करण्यास पात्र आहेत अशी प्रस्तुत लेखकाची ठाम भावना आणि भूमिका आहे.

आमचा नातू हृदयांश यास मनाच्या एका कोपऱ्यात ठेवूनच या ग्रंथाचे काम पूर्ण केले आहे. सौ. विजया, आमची कन्या सौ. श्वेता, जावई श्री. हर्षल तरडे, कु. अस्मिता, चि. अनिकेत तसेच सौ. मानसी बाबासाहेब रावण व सौ. दिपाली युवराज रावण यांचे कळत नकळत झालेले सहकार्य केवळ मोलाचेच होते.

माझे गावाकडील मित्र सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. आनंदा शंकर पाटील व धोंडीराम गणपती नाईक यांचे स्नेहाचे व मैत्रीचे संबंध प्रेरणा देत गेले.


हा ग्रंथ सिद्धीस नेताना 'परी' प्रकाशन व त्यांचे सहकारी यांनी नेहमीप्रमाणेच सहकार्य केले आहे. या सर्वांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

**– प्राचार्य डॉ. सहदेव चौगुले–शिंदे**
कोल्हापूर.
दि. २५ जुलै २०१३

# अनुक्रम


१. साफोक्लिस ............ ९
२. फ्रान्सिस बेकन ............ ३०
३. विल्यम शेक्सपिअर ............ ५०
४. जोहान व्होल्फगाँग गटे ............ ७१
५. फ्योदर दस्तयेवस्की ............ ९२
६. गस्टाव्ह फ्लाबे ............ ११३
७. लिओ टॉलस्टॉय ............ १३३
८. जोसेफ कॉनरॅड ............ १५३
९. जॉर्ज बर्नार्ड शॉ ............ १७३
१०. रॉबर्ट फ्रॉस्ट ............ १८७

# साफोक्लिस



(४९६ बी.सी. – ४०६ बी.सी.)

साफोक्लिसचा जन्म इ.पूर्व ४९६ साली अथेन्सजवळील कलोनस येथे झाला. सुमारे नव्वद वर्षांचे दीर्घायुष्य त्याला लाभले आणि त्याच्या साहित्याकडे पाहिल्यानंतर वाटते की त्याने त्या प्रदीर्घ जीवनाचे सोने केले. तो पेरिक्लिसचा मित्र होता. इ.स. पूर्व ४६८ साली त्याने इस्किलसचा पराभव करून शोकांत नाटकांबद्दलचे पहिले पारितोषिक जिंकले.

साफोक्लिसच्या जन्मावेळी अथेन्समध्ये मुक्त लोकशाहीचे वारे नुकतेच वाहू लागले होते. नव्या शासनपद्धतीचे प्रयोग सुरू होते. पुढे अथेन्सने माणसाचे जीवन आणि स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यास सुरुवात केली. जवळजवळ अर्धशतक अथेन्समध्ये एक प्रकारचे संपन्न सामाजिक जीवन व संस्कृती नांदत होती. साफोक्लिसने ते सामाजिक जीवन व समृद्ध संस्कृती आपल्या नाटकातून रंगभूमीवर नेले, लोकांसमोर ठेवले.

साफोक्लिसने शंभराच्यावर नाटके लिहिली; पण त्यातील फक्त सातच आज अस्तित्वात आहेत. ही नाटके त्याने आपल्या मध्यम वयात किंवा उतरत्या वयात लिहिली असावीत असा अभ्यासकांचा अंदाज आहे. 'अँटिगनी' या नाटकाचे शेवटचे वाक्य 'We learn when we are old' हे साफोक्लिसच्या बाबतीतही खरे वाटते.

साफोक्लिसला अथेन्समधील लोक सन्मानाने वागवत असत. शोकांतिका लिहिण्याची कला त्याने इस्किलसकडून आत्मसात केली. त्याने शोकांतिकेत नवीन नवीन गोष्टी आणल्या. त्याचे प्रत्येक नाटक एक स्वतंत्र कलाकृती वाटते. त्याने कृतीला नाटकात महत्त्वाचे स्थान दिले. अजॅक्स, अँटिगनी, किंग इडिपस, इडिपस ॲट कलोनस, इलेक्ट्रा, वुमेन ऑफ ट्रॅचीस व फिलॉक्टेट्स ही त्याची सातच नाटके अस्तित्वात आहेत.

स्थूलमानाने इ.पू. ५०० ते ३२२ हा काळ ग्रीक संस्कृतीच्या उत्कर्षाचा काळ समजला जातो. या काळात ग्रीकांनी धार्मिक, राजकीय, कलात्मक आणि वैचारिक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती करून पाश्चिमात्य संस्कृतीचा पायाच घातला असे म्हटल्यास ते चुकीचे होणार नाही. या काळात लोक मुक्तपणे विचार करू लागले, लोकशाही स्वातंत्र्याचा उपभोग घेऊ लागले. या काळात माणसाला शंका व्यक्त करता येत असे. अधिकारवाणीला प्रश्न विचारण्याची सामान्य माणसाची तयारी होती. परंपरेला धक्का देऊन तिला दुबळी करण्याची माणसाची मानसिक तयारी होती. जे स्वीकारता येत नाही त्याच्यात बदल करण्याबद्दल लोकांचा आग्रह असे. या काळातील सर्वच क्षेत्रांतील विचारवंतांनी व तत्त्वज्ञान्यांनी जीवनाचा अर्थ काय हे जाणून घ्यायचा प्रयत्न केला, तसेच माणसाचे या अफाट विश्वातील स्थान काय यावरही चिंतन केले. या अशा सर्व विचार-आचारांचा परिपाक म्हणजे ग्रीक तत्त्वज्ञान होय. थोर नाटककार इस्किलस (५२५-४५६ बी.सी.), साफोक्लिस (४९६-४०५ बी.सी.) व युरिपिडस (४८०-४०६ बी.सी.), इतिहासतज्ज्ञ हिरॉडोटस व थ्युसीडीड्स, तत्त्वज्ञ सॉक्रेटिस, प्लेटो व ॲरिस्टॉटल व शास्त्रज्ञ अनॅक्सॅगोरस, हेरॅक्लिटस व डिमॉक्रिटस या सर्वांनी ग्रीक संस्कृती समृद्ध करण्यात फार मोठे योगदान दिले आहे.

अशा वैभवी काळात इस्किलस, साफोक्लिस व युरिपिडस यांनी आपल्या शोकांतिका लिहून मानवी जीवनातील औदार्य, उदात्तता, क्रौर्य, दुष्टता यांचे त्यांच्या समाजाला दर्शन घडवले व समाजमन हलवून, हादरवून सोडले.

साफोक्लिसच्या शोकांतिकांचा विचार करण्यापूर्वी ग्रीक शोकांतिकेची काही मूलभूत तत्त्वे समजून घेणे उचित ठरेल. शोकांतिकेचे स्वरूप समजून घेताना ॲरिस्टॉटलने केलेली शोकांतिकेची व्याख्या पाहणे गरजेचे ठरते कारण ती एका तत्त्वज्ञाने केलेली शोकांतिकेची जवळजवळ पहिली समर्पक व्याख्या आहे. ॲरिस्टॉटल म्हणतो :



> "Tragedy is a representation of an action, which is serious, complete in itself, and of a certain length, it is expressed in speech made beautiful in different ways in different parts of the play; it is acted, not narrated, and by exciting pity and fear, it gives a healthy relief to such emotions."

शोकांतिकेची ही व्याख्या ॲरिस्टॉटलने समकालीन शोकांतिकांचा अभ्यास करून केलेली असल्यामुळे फार वजनदार व व्यापक झाली आहे. शोकांतिका हे जीवनाचे प्रतिबिंब असते. हे जीवन गंभीर, आपल्या परीनं परिपूर्ण असते आणि त्याला विशिष्ट लांबी असते. शोकांतिकेची भाषा ही विविध मार्गांनी नाटकातील विविध ठिकाणी सजवलेली, नटवलेली भाषा असते. शोकांतिका ही रंगभूमीवर दाखवायची असते, ती निवेदनातून सांगायची नसते. शोकांतिका आपल्या मनात भय आणि दया या भावना निर्माण करून अशा भावनांना एक निरोगी मार्ग मोकळा करून देते.

उपलब्ध असलेल्या बहुतांश शोकांतिकांचा सूक्ष्म अभ्यास करून ॲरिस्टॉटलने शोकांतिकेबद्दल आणखी काही मूलगामी विचार मांडले आहेत. त्या सर्वांचा इथे विचार करणे शक्य नाही आणि योग्यही नाही. तरीही त्याच्या 'थिअरी ऑफ कॅथार्सिस' व 'ट्रॅजिक हिरो' या दोन संकल्पना आपल्याला माहीत असायला हव्यात.

ॲरिस्टॉटलने शोकांतिकेच्या व्याख्येत शोकांतिका 'पिटी' आणि 'फिअर' या दोन भावना निर्माण करते असे म्हटले आहे. याचाच सविस्तर विचार म्हणजे ॲरिस्टॉटलची 'थिअरी ऑफ कॅथार्सिस' अथवा 'विरेचनाचा सिद्धांत.' या सिद्धांतात ॲरिस्टॉटल म्हणतो की, शोकांतिका श्रोत्यांच्या मनावर कित्येक आघात करत असते. कथेतील घटनांना मानवी प्रतिसाद म्हणून त्यांच्या मनात अनेक प्रकारच्या भावना निर्माण होतात. त्यांच्यातील महत्त्वाच्या दोन भावना म्हणजे 'पिटी' व 'फिअर'. शोकांतिकांचा आपल्या मनावर जो भावनिक परिणाम होतो त्याचा खोलात जाऊन केलेला सविस्तर समीक्षात्मक विचार म्हणजे कॅथार्सिस होय.

धार्मिक अर्थानं कॅथार्सिसचा अर्थ Purification असा तर वैद्यकीय परिभाषेत त्याचा अर्थ Purgation असा घेतला जातो. कॅथार्सिसला एक तिसरा अर्थही आहे आणि तो म्हणजे त्याचा Moral sense. याचाच अर्थ असा की कोणतीही उत्तम शोकांतिका आपल्या मनाचे स्वच्छीकरण, शुद्धीकरण करते. कारण इथे जीवनाचा